१५८८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५८८

# क वेळ

## मा ग न



REFBK 0017548
REFBK-0017548

कुसुमाग्रज

# वादळवेल

# कुसुमाग्रज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम. ... दि. ...
वर्गीकरण ... नोंद दि. ...

# वादळवेल

REFBK-0017548
REFBK-0017548
१०५४

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९, बुधवार, पुणें २

© वि. वा. शिरवाडकर

किंमत पांच रुपये

पहिली आवृत्ति १९६९

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अशा क्षणाला | ९ |
| २. | केवळ | १० |
| ३. | तुर्क | ११ |
| ४. | सांस्कृतिक यमक | १३ |
| ५. | जत्रा | १४ |
| ६. | कोकिळा | १६ |
| ७. | क्षणिक | १८ |
| ८. | अश्वत्थामा | १९ |
| ९. | तुझ्या पथावर | २२ |
| १०. | शर्त | २३ |
| ११. | आकाश सांगते— | २४ |
| १२. | पीस | २५ |
| १३. | अघटित | २७ |
| १४. | शेला | २८ |
| १५. | जवान | २९ |
| १६. | तरी | ३१ |
| १७. | खंत नाही तुला | ३२ |
| १८. | कारण | ३४ |
| १९. | नकोशी | ३५ |
| २०. | रंग | ३७ |
| २१. | गवळण | ३८ |
| २२. | झाड | ४० |
| २३. | झोल | ४१ |

२४. कोण ४३
२५. असह्य ४५
२६. सांज ४७
२७. अशब्दा ४९
२८. चाक ५१
२९. स्वर ५२
३०. मोगरा ५४
३१. झाडे ५५
३२. त्या मार्गावर ५६
३३. सोम ५८
३४. पराजित ५९
३५. प्रश्न ६०
३६. रात्र ६२
६३. द्वंद्व ६३
३८. समज तरी ६४
३९. आकलन ६६
४०. गुन्हा ६८
४१. दुर्ग ६९
४२. वादळवेडी ७१
४३. सांत्वन ७२
४४. डोह ७३
४५. माघारी ७४
४६. बिऱ्हाड ७६

मराठी ग्रंथ ..., ठाणे, स्थळ...
अनुक्रम ........................ दि. ..............
क्रमांक ........................ नोंद दि. ..............

| | | |
|---|---|---|
| ४७. | हिरवा खंदक | ७८ |
| ४८. | अघटित | ८० |
| ४९. | गीत | ८१ |
| ५०. | लावणी | ८३ |
| ५१. | अंतर | ८४ |
| ५२. | दुर्गारूप | ८५ |
| ५३. | चुगली | ८६ |
| ५४. | मूर म्हणाला : | ८८ |
| ५५. | जरा जवळता | ९० |
| ५६. | सूत्रधार | ९१ |
| ५७. | यमके | ९२ |
| ५८. | यमके | ९४ |
| ५९. | वाट | ९६ |
| ६०. | कबुली | ९७ |
| ६१. | आग | ९८ |
| ६२. | नकार | ९९ |
| ६३. | चांद माझा – | १०० |
| ६४. | कालकन्या | १०१ |
| ६५. | ही सराई | १०३ |
| ६६. | पंढरीच्या राया – | १०४ |
| ६७. | वादळ-वेल | १०६ |
| ६८. | आदिवासी | १०७ |
| ६९. | सर्व | १०८ |

# वादळवेल

## अशा क्षणाला

अखेर माझे जीवन म्हणजे माझे कळणे
तिमिरहि माझा दिवाहि माझा माझे जळणे

परंतु केव्हा अशा क्षणाला
लाख गवाक्षे भवती खुलती
उचलुनि घेती रस्त्यावरुनी
प्रकाश काही काही माती

आणि पुन्हा विवरात चालते जुनेच जळणे
परंतु त्या ज्वलनात उमलते नवीन कळणे

ग्रंथ संग्रहालय
१. क्र.
१०५४८

## केवळ

या रस्त्याला फांदीवरती
लागुनिया धस चिरून पडले
        नाव तुझे

या वाटेवर कुण्या नदीने
नेले वस्त्रापरी ओढुनी
        गाव तुझे

या मुलखातिल पंचभुतांनी
ओरखडोनी सर्व तोडले
        मखर तुझे

केवळ माझ्या नभात स्त्रीपण
अंबरगत ज्वालेपरि उरले
        प्रखर तुझे.

## तुर्क

खोल तळाशी
तुर्क एक हा
बारा तेराव्या शतकातिल
किनखापाचा तंबू रोवुन
रहात आहे—

पहाट वेळी
भरल्या डोळी
जळे हिऱ्याचा दिवा उशाशी
लाल पारव्या गिरद्यावरती
सुरूप्रमाणे नभात गुंतुन
स्तब्धपणाने
कनात सारुनि व्याधमृगाचे
घड तेजाचे
पहात आहे—

खजुरीपाशी
दहिवरलेल्या
रेतीमधल्या तृणांकुरावर

खूर मारतो उमदा अरबी
चांदल घोडा—

दूर कारवां
होउनि जागा
किणकिणती कंठातिल घंटा
पहाट पिउनी ते स्वर सांगत
ऊठ मुशाफिर
तुला मनाई सदनपणाची
अवधी आता
उरला थोडा.

## सांस्कृतिक यमक

आकाशात
तारा
गव्हाणीत
चारा
वेश्येच्या
वेणीत
मोत्यांचा
तुरा

आमुच्या पोटात
मांसाळ बीभत्स
काळीज चिरणारा
मेंदूत शिरणारा
भुकेचा
सुरा.

## जत्रा

विद्युत् झोत जरीचे रंगित
साजतुरा या हवेस देती
किती दुकाने—किती खेळ हे—
अभाव सारे लखलख करती.

मैफल कोठे स्वररंगांची
तंग कुठे किनखापी नर्तन
जादुगार मणियार जव्हेरी
दर्शनमात्रे हारपते मन.

सोडुनि मी तव हात धावतो
स्वैरपणाने मुलाप्रमाणे
(इथे हरवतो तिथे प्रगटतो
पहाडातल्या जलाप्रमाणे.)

इतुका जातो दूर कधी की
हात तुझा मज दिसतच नाही
फक्त हाक तव दुरून कातर
कानावर मम थेंबत राही.

कशी वहावी चंचलता ही—
        व्यथा मनोमन तुझी जाणतो
अगतिक मी पण—अशा ठिकाणी
        सर्वस्वासह विकून बसतो.

पण आहे जत्रेला शेवट
        स्रोत विजेचे विझतिल सारे
पडतिल पडदे इंद्रपुरीवर
        तमात उरतिल केवळ तारे.

नदीकडेने वाट पुढे ती
        भयाण निर्जन काळोखातुन
माहित मजला, साथ कुणाची
        तेथे नाही तुझियावाचुन.

# कोकिळा

(गझल)

कोकिळा जेव्हा सुरांचा
        फुलविते पंखा निळा
आम्र लेउनि पंख तेव्हा
        होउ बघतो कोकिळा

कोकिळा जेव्हा स्वरांची
        उघडते अबदागिरी
जंगले शाहीर होती
        शब्द होते मंजिरी.

कोकिळा जेव्हा स्वरांची
        काश्मिरे करिते उभी
हो नदीची नृत्यशाला
        रुमझुमे वारा नभी.

कोकिळा जेव्हा स्वरांची
        माळते सुमनावली
तेधवा वणवा म्हणे मी
        चंदनाची सावली.

कोकिळा घाली स्वरांचा
मोरपंखी फुलवरा
जांभळ्या डोही झपूर्झा
खेळती त्या आसरा.

कोकिळा जेव्हा ढगांना
आर्ततेने बाहते
धूसरावर स्वप्न त्यांच्या
एक सुंदर वाहते.

कोकिळा जेव्हा सुरांचे
गेंद गगनी फेकते।
अंचलावर पैठणीच्या
रात्र अत्तर ओतते.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
२९३४०

कोकिळा स्वरशिल्प असले
बांधता शून्यावरी
आसमंते होत सारी
क्षुब्ध आणिक बावरी.

कोकिळा शिशिरात शिरुनी
बर्फ जेव्हा होतसे
या जगाला सर्व तेव्हा
जाग थोडी येतसे.

## क्षणिक

मस्तक ठेवुनि
        गेलिस जेव्हा
अगतिक माझ्या
        पायावरती

या पायांना
        अदम्य इच्छा
ओठ व्हायची
        झाली होती.

# अश्वत्थामा

गहन अरण्ये निबिड दऱ्यांतुन
गजबजलेल्या नगरपथांतुन
नदीतटाच्या
रेताडातुन,
प्रचंड सुळके पहाड विवरे
भयाण दलदल माळ अचेतन
पडक्या विहिरी कुहरे यातुन,
सांज सकाळी दुपार रात्री
अमरणतेचा शाप शिरावर
फुटक्या घेउन,
विखारलेल्या शत जखमांची
असह्य यातना शरिरावरती
साहुन,
सूर्यमंडळातुनि तुटलेल्या
नक्षत्राच्या तुकड्यापरि हा
अश्वत्थामा
फिरतो आहे.

धुके गळे नजरेतुनि केवळ
असे पाहणे,
गतीत ना जाणीव दिशांची
असे चालणे,
कधी सावलीपरी वडांच्या
सरोवरावर पेंगत पडतो,
शहरशिवेवर श्वानस्वराने
केव्हा रडतो,
शिवालयांच्या राजघरांच्या
कधि घुमटावर विषण्ण बसतो,
कधि खिडक्यांच्या काचेवरती
खेटुनिया मुख मधल्या रात्री
कालकुटाचा मेघ फुटावा
तसले हसतो.

कुरतडुनी रानातील वणवे
ते जखमांच्या घळीत भरतो,
जहाज होउनि कधि फुटलेले
महोदधीच्या तळात शिरतो,
पृथ्वीवरच्या स्तब्ध नभावर
आदळुनी कर,
पिसाटतेने पिशाच्चतेने
अविरत भटकत
धावत लोळत
हासत क्रंदत,

दिशादिशांच्या वेशीपुढती
उभा राहुनी ओरडतो तो—
चंदन द्या मज
चंदन द्या!

दा. क्र. ९५५४८

## तुझ्या पथावर

तुझ्या पथावर तुझ्या पदांच्या
पायखुणांच्या शेजारी मम
पायखुणा या उमटत जाती
खरेच का हे ?

मातीमधल्या मुशाफरीतुन
हात तुझा तो ईश्वरतेचा
चुरतो माझ्या मलीन हाती
खरेच का हे ?

खरेच का हे—बरेहि का हे—
दोन जगांचे तोडुनि कुंपण
गंधक–तेजाबासम आपण
मिळू पहावे

आणि भयानक दहन टाळण्या
जवळपणातहि दूर राहुनी
स्फोटाच्या या सरहद्दीवर
सदा रहावे ?

# शर्त

एकच शर्त की—
तुटताना रस्ते
वळून मागुती
        बघायचे नाही

वेगळ्या वाटेची
लाभता पायकी
असते नसते
        म्हणायचे नाही

वांझोट्या स्वप्नांचा
उबवीत दर्प
काळजात सर्प
        पाळायाचा नाही

दिवा हातातील
कोणासाठी कधी
काळोखाच्या डोही
        फेकायाचा नाही.

## आकाश सांगते—

तू तसा आहेस
तू असा आहेस
हे मला वारंवार सांगू नका,
कारण तुम्हाला नाही
तरी त्या आकाशाला मात्र
मी हजार वेळा सांगितलं असेल
मी कसा आहे.

शरीरमातीच्या सुंदरबनात
मनपणा जेव्हा फसतो
तेव्हा पश्चिमेच्या किरमिजी मांसलात
ओठ हरवलेले आकाश
मला सांगते
आश्वासक स्वरात
की आकाशपणाही असाच असतो.

## पीस

सूज्ञ माणसे सांगतात की
पीस विजेला कधीच नसते
कुणास ठाउक, ज्ञानालाही
अज्ञानाची किनार असते.

एके दिवशी परी नभाची
माझ्यावरची मर्जी फिरली
पर्जन्याचे पहाड फुटले
हिंस्र तुफाने घरात शिरली.

झापत आल्या घटा विजांच्या
काळ–खगापरि फिरल्या भवती
त्या प्रलयाने घरकुल माझे
पडे पिसारुन जमिनीवरती.

शांत जाहल्यावरती सारे
गगन पुन्हा ममतेने हसले
दगडविटांच्या ढिगारात त्या
पीस मला हे अवचित दिसले.

मी म्हणतो हे पीस विजेचे
(सूज्ञांचे मत असो कसेही)
रागावे नभ, दान परंतू
नंतर देते असेच काही.

# अघटित

पहाट दिसता क्षितिजावरती
विझावयाला
तयार झाला
रस्त्यावरचा
कुणी दिवा—
तोच चांदणी एक नभातिल
त्यास म्हणाली
(का ते केवळ जाणे ईश्वर)
थांब घडीभर
स्नेह तुझा मज
जरा हवा.

## शेला

बर्फाने रासलेला हा प्रारंभहीन दिगंत प्रदेश
क्षितिजाच्या शिवेपर्यंत दिसत नाही काहीही,
फक्त बर्फच.

रूपरसगंधाचे सारे समुद्र गोठविणारा
अनंत रहस्यांचे द्रव आपल्या निःशब्दात साठविणारा
जगायुगांच्या सीमा भावशून्य स्मितात थिजविणारा
फक्त बर्फच.

या बर्फाटाच्या मध्यावर उगवली ही चिमुरडी चंद्रशाला
सात रंगांच्या सहस्र शलाका अंतराळावर उधळणारी
रूपनगरची राजकन्या.

या शिल्पफुलाने केला आहे त्या सार्वभौम बर्फाचा पराभव
आणि फेकला आहे त्याच्या नग्नतेवर जरतारी शेला
भावाचा
अस्तित्वाचा
आणि अर्थांचाही.

## जवान

तो मृत्यूच्या महानदीवर
काळ्याशार जलाच्या काठी
पोलादाशी जन्म जोडुनी
उभा राहतो—

तो शरिरावर कोसळताना
वणव्याच्या लसलसत्या भिंती
पहाडतेने पैलथडीचे
श्रेय पाहतो—

तोडुनिया तो निर्दयतेने
पाशपिसांचे कोमल घरटे
सांध्य नभातिल खगाप्रमाणे
एकच उरतो—

तो अव्हेरुनि संसाराच्या
मातीमधली मांसल दाने
भागवतांच्या असंगतेचा
मळवट भरतो—

पगार घेउनि काही रुपये
तो रक्ताने लिही पावती
मोहर लावुनि सर्व जिण्याची
आम्हा देतो—

तो आहे हे म्हणून आहे
संस्कृतिचा हा निळा चांदवा
लाख तणावे खांब रोवुनी
जमीन धरतो.

## तरी

शंभर स्मितांचे
अडसर तुवा
घातलेस तरी

कट्यारी डोळ्यांचे
कठोर पहारे
ठेवलेस तरी

चंद्राळ स्पर्शांचे
आरस्पानी तट
बांधलेस तरी

खंदक दारचे
पापणी दवाने
भरलेस तरी

तुफानाशी सात
जन्माचे हे नाते
तोडशील काय

ललाटीचा लेख
उध्वस्त होण्याचा
खोडशील काय ?

# खंत नाही तुला

तुझिया दाराशी कित्येक दिसांनी
घेऊनि येतो मी तक्रार काही
भलाई तुझी की तुझ्या कचेरीत
तक्रारखोरांना नकार नाही.

असे हवे होते—तसे नको होते—
क्रोधाने कल्कल करतो फार
काय न्याय तुझा, दटावून कधी
आवेशात शिव्या घालतो चार.

संथ तुझी दृष्टी, मंद तुझे स्मित,
निरांजन जशी निर्वाती तेवे
जाणतो मी व्यर्थ फिर्यादी या साऱ्या
पृथ्वीच्या मुलांना नाही हे नवे.

निषेधाचे काही काढून उद्गार
पुन्हा मी माघारी प्रयाण करी
हातात दिवा तू घेऊन राहसी
उभा माझ्यासाठी देहलीवरी.

माहीत तुला की पुन्हा दीर्घकाल
नावही तुझे मी घेणार नाही.
जत्रेच्या हजार रंगांत रंगता
पुन्हा या वाटेला येणार नाही,

खंत नाही तुला, तुझ्या नयनांत
रागास लोभास दाद ना मिळे
फक्त ओठावर चिरंतन स्मित
कशात उगवे, कोणास ना कळे.

## कारण

अखेर जेव्हा
बांग पहाटे
ऐकू आली—
नेत्रावरती
नव्हते माझ्या
किरण
दिव्याचे—
होते केवळ
विसकटलेल्या
वाक्यामागुन—
अमृतकलशा
परी सांडल्या
स्मरण
स्मिताचे.

# नकोशी

हवीशीचे नात्र होते
　　　　नकोशी
नकोशीचे नाते फक्त
　　　　नभाशी.
नकोशीला घर नाही
　　　　दार नाही
वेगवेड्या तुफानास
　　　　पार नाही.
नकोशीला शील दिले
　　　　वरुणाने
कुंतलास पीस दिले
　　　　अरुणाने.
नकोशीच्या पापणीत
　　　　ओठावर
गंधर्वाच्या मदिरेचे
　　　　दहीवर.

हवी अशी नकोशी ही
लाखदाही
आणि नको तरी मला
एकदाही.
कारण् माझ्या नकोशीची
अशी अट
जीवनाच्या ज्वलनात
व्हावी भेट.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

## रंग

तळहातावर तुझ्या एकदा
लाल रंग मी असा पाहिला
गुलाबास जो कधी समजला नव्हता

तुझ्या कपोलावरी केधवा
लाल रंग मी असा पाहिला
जो गगनाला कधी गवसला नव्हता

वक्षावरती तुझ्या एकदा
लाल रंग मी असा पाहिला
जो पळसाला कधीच सुचला नसता

निरोप नयनी तुझ्या अखेरी
लाल रंग मी असा पाहिला
जो सरणासहि कधीच रुचला नसता.

## गवळण

माधवा, होतास आला एकदा यमुनातटी
सांध्यशांतव दाटलेले आणि मी तर एकटी.
अंगतेच्या राणिवेने न्हाण होते चालले
तो स्वरांचे गेंद काही दिग्लतांनी ओतले.
मंजुळाने मोहरे वर अंबराचा चांदवा
हा व्रजाचा इंद्र आला—कुजबुजे सारी हवा.
श्यामलेच्या लक्ष लाटा लक्ष झाली गायने
आम्रतालांच्या फण्यातुनि वाकली अभिवादने.
गजबजे मन माधवीचे नोवरी नवती जशी
पाकळ्यांच्या पापण्यातुन पाहते वेडीपिशी.
'आणि मी तर ही विवस्त्रा-काय आता व्हायचे?
तो–तटी–तो–राहिले–तो–दूर–तो–नेसायचे.
जाणिवांचा अस्त झाला रूपरेषा राहिली
नग्नता माझी दिशांच्या आरशावर सांडली.
तू असा की–तू तसा की–क्षोभ होते ऐकले
झाकुनी डोळे स्तनांचे मी जळावर वाकले.
संगमातुनि त्या स्वरांच्या येसि तू गीतापरी
उसवले आभाळ माझे—ठाकसी तीरावरी.

पाहिले तू—त्या दिठीला कामनेचा बाण ना
प्रेम नव्हते भाव नव्हता सुंदराची जाण ना.
सेवुनी जळ ओंजळीने तू वनी गेलास रे
अळगुजाच्या स्वरफुलांची दूर गेली पाखरे.
आणि मी मग प्राणतेने हाक तुजला घातली
जी प्रिया तू ना कधीही ना कधीही ऐकली.
वाटले, तुजला न कळले एका मीही राधिका
भीतिच्या होता तळाशी थेंब प्रीतीचा मुका.
आज समजे तेहि खोटे, मी मनाला मारले
देह झाले फक्त, त्याचे शापशासन भोगले.

•

## झाड

येतेस तू अशी
वीज येते जशी
मातीतला मोह सारा उपसून
जळालेल्या फांद्या नभी खुपसून
प्रकाशाचे पाय तेथे चाचपून
पडलेल्या फशी
झाडाकडे.

# बोळ

हाच बोळ तो—तिळभांडेश्वर आता नाव निराळे
या इकडुनि या—तिथे साचले चिखलाचे थारोळे.

पंखपिसाविण वृद्ध जटायू तसेच इथले वाडे
जीर्ण वारुळे, तयात मानव वसती हेही कोडे.

जपून टाका पाउल फारच अरुंद आहे वाट
अंधाराची शत वर्षांची त्यात इथे वहिवाट.

हाच कोपरा—हीच घरे ती—थांबा येथ जरासे
निथळत त्या भिंतींवर देखा अजुनी आर्त उसासे.

याच कोंदटामधून फुटल्या त्या मृत्युंजय ज्योती
धुमसत गेल्या ठिणग्या ज्यांच्या त्रिखंड पृथ्वीवरती.

काळोखावर याच पसरला असला दिव्य धुमारा
धुक्यातुनी वर तळपत आला एक तांबडा तारा.

मरणाचा द्रव काढुनि येथे लिहिली जीवनगाणी
वधस्तंभ येथून उधळले उसळे काळे पाणी.

'सुंदर मी होणार'—म्हणाला इथे पांगळा एक
करीत बसला निज स्वप्नावर रक्ताचा अभिषेक.

काळाच्या वळचणीस येथे बसे असा इतिहास
समईवाचुनि इथें समाधी उरली आज उदास.

## कोण

बसलो असता निवांत रात्री
टकटक झाली दारावरती
दार उघडता आत सरकली
कोणी व्यक्ती
बारिकतेने बघता कळले
हुबेहूब ती प्रतिमा माझी
दुसरी होती !
घाबरलो मी चाचरलो मी
पुसले त्याला-कोण-कशाला
स्मित संभावित करुनि म्हणे तो
पिशाच्च मी तव !
गतकालाच्या थडग्यामधला
निवास कोंदट असह्य झाला
म्हणून आलो,
मालक जेथे तिथेच थारा
मिळे अम्हाला.
पिशाच्च पण ते माझे होते
आपुलकीने स्वागत केले
गप्पा झाल्या

दूरपणाचे अंतर तुटले
आठवणींचे पर्व चाळता
काळिज कढले,
वादवखेडे कधी पेटता
क्रुद्ध शार्दुलासम गुरगुरलो,
प्रेम द्वेष हास्यात डुंबता
स्वरही चढले;
अखेर होता पहाट, गेला
एक आमुच्यामधला निघुनी
गेला कोण नि कोण राहिला
हें मज आता—जन्मभराचे—
कोडे पडले

## असह्य

माफ करा, पण
मला वाटते
अशा मुलींनी
(आणि मुलांनी)
        मरून जावे !
अपार थकवा
पंखावरती
नसे विसावा
नाही प्रीती;
दरिद्रतेच्या
अपमानांनी
पदापदावर
पिचते छाती;
निरालंबते–
मधे नभाच्या
घरट्यावाचुनि
या पिल्लांनी
        किती उडावे ?

फुरसत नाही
हसावयाला
रडावयाची
सवलत नाही,
जगावयाची
सक्ति परंतू
त्या जगण्याला
आशय नाही;
केवळ थकणे
शिणणे कण्हणे
अन्यायांच्या
तटात चिणणे,
असे मनाचे
लक्तर अवजड
या चिमण्यांनी
किती सहावे ?

# सांज

सांज नभाच्या गूढ शलाका
काही धूसर,
निळ्या पर्वती लाटांमधले
गहन जगाच्या जन्माचे स्वर,
नक्षत्रांचा चुराच असली
थोडी रेती,
माडामधल्या काळोखावर
तरंगणारी थोडी भीती,
स्तब्ध घनांचे
चांद कोपरे,
चार दिशांचे ओठ पिणारे
प्रमत्त वारे;
इंद्रजाल त्या सृष्टीमधले
असले काही काही जमवुन,
बांधित होते
स्वप्नशिलांचे
परीकथेतिल शहर तुझे मन.
कळले मजला
—तुझ्या मनातिल बांधकाम ते कळले मजला,

मौनातुनिही नाद तयाचे
कानी पडले,
त्या शहराच्या तटात शिरुनी
—तुला न कळले—
मी तुजला हृदयाशी धरले.

## अशब्दा

तूहि अशब्दा
मीहि अशब्दच.
श्लोकावाचुन घडले आहे
शतकांडांचे हे रामायण.
अक्षरही नसता दिमतीला
दोन मनांवर पूल बांधला
होता आपण,
पहाडातल्या ढगाप्रमाणे
खडकावर झाडावर पिंजुन
पडलो आपण,
षड्जावाचुन रचली गीते
देहावाचुन रतलो आपण
वेदामधल्या तरुण उषेसम
कनकाचा रथ घेउनि गगनी
स्तब्ध किनाऱ्यावरी निशेच्या
फिरलो आपण.
आता ते सरल्यावर सारे
त्या सर्वांची
करावयाला जणु भरपाई

मधल्या रात्री
एकांताच्या तळघरात मी
घालित बसतो
शब्दांच्या ऐरणीवरी हे
शब्दांचे घण !

# चाक

रस्ता तुमचा,
रथही तुमचा,
रथचक्राला बांधुन मी हा
धावत आहे
जोवर मी हे मानित आहे.
तोवर
तोवर
तोवर सारे
चक्राखाली चिरडत माझ्या
नभोगतांचे निळे पिसारे,
तोवर तुमच्या पथधूलीवर
रक्ताची मम
धार किनारे,
तोवर माझ्या अस्तित्वाचे
अपूर्व स्पंदन
सूर्य—कुलातिल या गोलावर
चिरते आहे,
जोवर माझ्या उरात तुमच्या
चाक रथाचे फिरते आहे.
तोवर...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १०५४८

# स्वर

उदाहरणार्थ निषाद
—कोणत्याही सप्तकातला
नादाच्या परमाणूंची एक अखंड रेषा.
अवकाशात आकारणारा
एक नुसता स्वर.
आकाशात तरंगणाऱ्या निराशय
उनाड ढगासारखा
अगदी रिकामा.
एकाच रस्त्याने सरळ चालणारा
केवळ गतीचेच भान असलेला
भावशून्य प्रवासी.

पण या निषादाला जेव्हा मिळतात
इतर सहा स्वरांचे संदर्भ
संवादी विसंवादी
तीव्र आणि कोमल
गोल, नागमोडी आणि सरळ,
त्याच क्षणी
त्याला लाभतो आकार आणि स्वभाव

कधी कठोर, कधी प्रेमळ,
कधी उदास, कधी दयामय, कधी शांत.
रिकाम्या ढगातून लागतात द्रवायला
सांज उषेचे किरमिजी कण,
द्रवते पुनवेच्या चांदण्यातील
कस्तुरी कामुकता,
अमावास्येच्या क्षितिजावर माथा टेकणारे
थकलेल्या विश्वाचे एकाकीपण.

मी आहे
असाच एक निषाद
आणि असेच कोणी स्वर आहेत
माझ्या सभोवार,
संदर्भात स्वभावणारे
सारेजण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.............. दि: ..............
क्रमांक .............. नोंद दि..............

## मोगरा

असा मोगरा समोर फुलता
दूरपणाचा दत्तक बाणा
कसा रहावा
मलयगंध देहात दाटता
गतागताचा शीर्ण नकाशा
कुणी पहावा
इंद्रजाल हे असे उमलता
स्वप्न म्हणे ही जमीन माझी
घटकेकरिता
सागर विसरुनि, धवल फुलांनो,
तुमच्यासाठी उभी राहिली
जीवनसरिता.

## झाडे

झाडांना पानोपानी
        असतात नेत्र हे कळले
हे पाय तुझ्या सदनाच्या
        बाजूस जेधवा वळले.
मी म्हटले शूरपणाने
        ना यात वाकडे काही
ही दोन मनांची यात्रा
        पार्थिवात नाही—नाही.
पण झाडे मख्ख उभी ती
        राहिली तशीच पहात
पांघरून खांद्यावरती
        ती ढगाळ धूसर रात
चालेल म्हणाला चंद्र
        चांदण्या म्हणाल्या छान
पण झाडांच्या नजरेचे
        हलले ना एकहि पान

## त्या मार्गावर—

हजार हास्ये
स्मिते असंख्यच
या वाटेवर
        मला भेटती
दोन थडींच्या
गर्द तृणातुन
फुलांप्रमाणे
        अवचित उठती
सांजकाळच्या
धूसरतेतुन
चंद्रकरांचे
        स्वरूप घेती
जरठ तरूंच्या
फांद्यावरुनी
भुताप्रमाणे
        घसरत येती

आणिक माझा
मार्ग अडवुनी
उदासतेने
मजला म्हणती
शरीर कोठे
आम्ही कोठे
हीच काय रे
अमुची नियती !

## सोम

असे कसे हे अघटितघडते
विचारसी तू
अशाकशाला परंतु केव्हा
असतो हेतू ?
अशाकशाला प्राज्ञ प्रबंधा–
परी न कारण
तर्क तोडुनी स्वैर उठे हे
जारण मारण.
अशाकशांची पोकळीतली
ही रहदारी
म्हणून होते अधांतरातिल
सह्य पथारी.
परंतु असले तत्त्वविवेचन
हवे कशाला
यज्ञामधला सोम चोरटा
पुरे अशाला.

# पराजित

या अर्थांच्या
भुयारात मी
        जेव्हा शिरतो
अनाद्यन्त ये
तमात भोवळ
        मी थरथरतो
शतशतकांचे
शिरि शेवाळे
        भयाण हिरवे
सवाल असले
समोर येती
        कुबडे तिरवे
निरर्थकातिल
सखासोयरा
        प्रकाश मरतो
आणिक मी भय–
भीत पराजित
        मागे फिरतो.

## प्रश्न

तुझ्या देवडीशी
अखेरी जेधवा
बांधीन माझे हे
थकलेले घोडे—
तेव्हा ओटीवर
(आत जाण्यापूर्वी)
करू मूलभूत
विवेचन थोडे.
अंधाराचे डाग
लाख माझ्या अंगा
नसे मला त्याची
खंत अजिबात,
—दिवस आकाशी
जाती ओघळून
देहावर पण
गोठतसे रात.
प्रश्न सुकृताचा
नाही वा पापाचा

वटारून डोळे
बोल हवे तसे–
मूळ प्रश्न माझा
योजनेवाचून
गोंधळ हे भव्य
केलेस तू कसे ?

## रात्र

रात्र अशी ही
जिच्यात बुझती
गगनपणाच्या
        सगळ्या रेषा
उरती केवळ
पाणथळीतिल
हिरव्या ओल्या
        या अभिलाषा
रात्र अशी ही
खेचित दावण
तबेल्यात मज
        घेउनि जाते
स्वरात मर्मर
मला सांगते
इथे जिण्याचे
        सार्थक होते.

## द्वंद्व

तत्त्वे आहेत दोनच :
माती आणि आकाश
तुमच्यात आणि—
        माझ्यातही.
माती आली पृथ्वीतून
आकाश आले अवकाशातून
एक शिरले देहात
आणि दुसरे बसले मनात.
दोघे खूपच भांडले
हिचे काळे त्याचे निळे
रक्त थोडे सांडले
अखेर जिवात काळीनेच
प्रस्थ आपले मांडले.
आता माती खजील झाली
तिचे काळे करडे कण
आकाशाच्या सांदीत जाऊन
धरतात त्याचे निळेपण.

## समज जरी

समज - रंग जळत्या सोन्याचा
होउनि मी मद्यामधि भरलो
समज जरी मी काजळ होउन
नायकिणींच्या नयनी शिरलो —
समज जरी मी अमरपणाने
दरसगंधाचे प्यालो हिवर
अशातशांच्या सराईत वा
समज टेकलो या रस्त्यावर —
असेल साहस या सर्वातुन
दुर्बलतेला करावयाचे
मरणाच्या छायेमधि अथवा
थोडे जादा जगावयाचे.
असेल हेही असेल तेही
वा मातीची फक्त उधाणे
असेल अथवा रितेपणावर
विणावयाचे रंगित गाणे.

असेल काही — पण पलिकडचा
मी जर तुजला दिसलो नाही
म्हणेन परिचय झाला अपुला
परंतु ओळख झाली नाही.

## आकलन

तू बसतेस
स्वतःभोवती रचून
एक अतिशय जाड
पण हवेसारखी पारदर्शक
नादवाही स्फटिकाची
दफनपेटी.
कोणालाच कळत नाही
कळलेले नाही
कारण त्या पेटीतून दिसतो
तुझ्या जीवनाचा आविर्भाव
ऐकू येतात तुझे शब्द
तुझे उसासे
तुझ्या हातातील सतारीचे
दुःखाचे दाईपण करणारे
पांढरेशुभ्र स्वरही.
मात्र मला कळले ते
एकट्याला
कारण क्षमायाचनेसाठी
मी पुढे होऊन

तुझा हात हातात घेऊ लागलो
तेव्हा
माझा हात तुझ्या हातापर्यंत
पोचलाच नाही.
तो पोचला होता फक्त
तुझ्या भोंवती असलेल्या
पारदर्शक अदृश्य
दफनपेटीपर्यंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८९३५० दि: ...

## गुन्हा

मी म्हटले होते
        चंद्र जाहला जुना
दाखले तयाचे
        किती द्यायचे पुन्हा
परि तुझ्यात भरला
        चंद्रपणा इतुका की–
हो अन्य दाखला
        येथे केवळ गुन्हा.

## दुर्ग

बलाढ्य चिऱ्यांचा बांधला दुर्ग मी
दिमाखडौलाने बसलो आत
झरोक्यामधून म्हटले तुजला
विवेकवंतांची अशी ही रीत.
नदीच्या किनारी झाडाच्या तळाशी
घेऊनि मस्तकी अपार लाज
म्हणालीस आम्हा कंगालांच्या घरी
कोठुन एवढा श्रीमंती साज !
बढाईच्या बाता सांगून, बांधावा
दुर्ग कसा हेही बोललो तुला
कोणते साहित्य, कोणती हत्यारे
कोठून आणाव्या दणगट शिला.
असा हा शेखीचा अध्याय संपून
समोर ठाकता तुटीचे पर्व
पाठमोरी तुझी पाहोनिया चाल
बांधकाम माझे थरारे सर्व
वळताना वाट, पापणीच्या खाली
दिसला ओलावा—तेच हो पुरे

कोठले ज्ञान अन् कोठला विवेक
गंजिफाप्रमाणे पडले चिरे
दुर्ग तो लोपला, माळावर उभा
उरलो एक मी उजाड झाड
पाउलचिन्हांच्या रांगेवर तुझ्या
ओततो दृष्टीचे उन्हाळी कढ,

## वाद्ळवेडी

वादळवेडी विस्मयकर ही दीर्घकुंतली जात्!

कधि वणव्याच्या मुकुटावरती तुरा होउनी फिरे
देवघरातिल होत केधवा संथ शांत फुलवात्.

कधी पतीस्तव सती होउनी सरणावरती चढे
कधि जारास्तव विश्व जाळुनी घुसते वनवासात्.

तीर्थरूप ही कधी वाहते अमल जान्हवीपरी
कधि खिडकीतुनि मांसल हिरव्या नजरेची बरसात्.

नागिण होउनि कुठे टाकते कालकुटाच्या चुळा
कुठे प्रगटतो हिच्याच देही ईश्वरतेचा हात्.

उषा होउनी कधी करितसे प्रतिभेची लावणी
कधि शालूसम नेसुनि बसते ही अवसेची रात्.

हसणे रुसणे कधी दावते दवबिंदूची कुळी
कधि खडकावर कठोरतेने करी लीलया मात्.

ही रसरंगित करी सुगंधित जीवन म्हणती जया
हीच ठेविते फुटकळ मरणे किनखापी बटव्यात्.

# सांत्वन

अंतर होते तसे परंतू
        असेहि आता पडावयाचे
माहित होते मनामनाला
        अखेर हेही घडावयाचे.
खंत कशाला, श्रावणतेचा
        खजिना फुटला गगनावरती
इंद्रजाल ते काय कुडाच्या
        या भिंतीवर चढावयाचे ?
नियती देते दान असे की
        खिशामधे जे मावत नाही
खिसे असे कंगाल मिळाले
        त्यासाठी का कढावयाचे ?
अपुल्या भिंती खिसेहि अपुले
        अभेद्य त्यांची हुकमत असते
म्हणून का तिमिराचे घुंगट
        या घटकेवर विणावयाचे ?

## डोह

डोहात बुडणाऱ्या
बुडत जाणाऱ्या
तळाशी पडणाऱ्या
        दगडासारखा—
मी सर्वस्वी बुडतो
शेवाळलेल्या पाणकाळोखात
आणि तरीही उरतो
        त्या दगडासारखा
        माझा मीच.
अंगावर घेतो मी
सगळा अफाट डोह
त्यातील हिरवे काळे पाणी
त्यातील वनस्पती
त्यातील सर्प
आणि तरीही उरतो
        त्या दगडासारखा
        माझा मीच.

## माघारी

मी व्यभिचारी बनले आणिक
शत मंचांवर निजले
व्यभिचारचे तत्त्वरसायन
सांजसकाळी प्याले.
मी म्हटले की शरीर माझे
जीवनमनही माझे
काळोखातिल सात पदांचे
किती वहावे ओझे !
तू न हटकले बंद न केले
कधी घराचे दार
अमृत नयनी तुझ्या न दिसली
कधी विषाची धार.
कर्दमयात्रा करून माझी
भोगलालसा धाली
तिच्या काठच्या लाख दिव्यांची
किनार आता विझली.
मलीन वसने सावरीत मी
कलुषित शरिरावरती

मान खालती घालुन आले
तुझ्या निवासापुढती.
उदाधुपाचा सुवास येथे
नभी तरंगत राहे
एक दिवा अंगणात जळुनी
मज बोलावत आहे.
तुझ्या दयेला नसे दयाळा
पार्थिव कृपण किनारा
नको तुझे घर नको तुझा कर
दे ओटीस निवारा.

## बिऱ्हाड

माडीवरती
नाही वसती
बंद कवाडे
अवघी असती
तरीहि तेथे
मधल्या रात्री
चार दालना-
मध्ये कुणाची
संथ पावले
 कानी पडती ?

माडीवरती
बिऱ्हाड नाही
दिवस उजेडी
दिसे न काही
रात तमावर
तिथे परंतू
निळया प्रभेचा
दिवा कुणाचा
 तेवत राही ?

माडीवर ना
फिरते कोणी
ना रहदारी
ना निगराणी
तरीहि तेथे
उत्तर रात्री
कोणाचा स्वर
सारंगीवर
        गातो गाणी ?

## हिरवा खंदक

तुझिया घराला कवाडे हजार
रखवालीसाठी
प्रत्येक दाराच्या कपाळाला आहे
लोखंडाची आठी
आहे का माहीत जमीन दारची
मंत्रावली आहे
उंबऱ्याच्या खाली वादळात रात्र
कालवली आहे
अल्याड वेढतो हिरवा खंदक
शेवाळले जळ
जुनाट केसाळ सर्पांनी तयाचा
व्यापलेला तळ
तुला न ठाऊक परी मी पाहिली
शंभरदा तरी
तुझ्या दारापाशी बसलेली आहे
एक काळी नारी
कंजारी केसांत गुंफलेले तिच्या
ठिणग्यांचे कडे

उघड्या काजळी स्तनांस गेलेले
        रगताचे तडे
कान देउनी ती वाकलेला स्वर
        खुपसते नभी
कशाला राहसी भावल डोळ्यांनी
        सौधावर उभी ?

# अघटित

असले चेटुक चेटकिणींच्या
इतिहासातुन
कधी न घडले—
कमलकळ्यांची कैद तोडुनी
समीरणासह पसार झाले,
द्राक्षाकांवर पहाटवेळी
तरंगणारे दहिवर प्याले,
उषःकालच्या अरुण घनाची
किनार ल्याले.
अघटित असले करून ते स्मित
गळ्यात घालुनि कोर सातव्या
मदिर लाजऱ्या चंद्रकलेची,
शत कोसांचे लंघुनि अंतर
माझ्या मागे
धावत आले.

# गीत

स्मरशिल राधा स्मरशिल यमुना
स्मरशिल गोकुळ सारे
स्मरेल का पण कुरूप गवळण
तुज ही जगदीशा रे ?

रास रंगता नदीकिनारी
उभी राहिले मी अंधारी
न कळत तुजला तव अधरावर
झाले मी मुरली रे.

ऐन दुपारी जमीन जळता
तू डोहावर शिणून येता
कालिंदीच्या जळात मिळुनी
धुतले पाय तुझे रे.

सांजकाल कधि टळून गेला
तरी न माधव परतुनि आला
किरण दिव्याचा होउनिया मी
जळत पथी बसले रे.

मथुरेच्या त्या राजघरातुन
कुंजवनी परतता तुझे मन
उपहासास्तव तरी कधी तू
आठव करशिल का रे ?

## लावणी

रंगित रस्ते बंद मला हे
        मोह मुलायम धरू नका
त्या किनखापी स्वप्नपुराची
        कनात वरती करु नका
    मठ उभा करोनी मनात मी राजसा
    जोगीण जाहले हा जन्माचा वसा
    मज दिला भवाने शून्याचा वारसा
काळोखाच्या तळघरात या
        दिवा घेउनी शिरू नका
गर्भरेशमी जरिपटका या
        निवडुंगावर चिरू नका.

## अंतर

हे अंतर तर आहे
फक्त काही नद्यांचे,
काही घाटांचे काही डोंगरांचे,
माळाच्या एकांतावर जटा आपटीत बसलेल्या
काही रागावलेल्या वादळांचे,
गाववस्तीच्या शिवेवरील
थोड्या पडक्या देवळांचे.
पण हे अंतर असते खूप जास्त
खूपच जास्त,
तरी देखील—
मध्यरात्रींच्या मच्छरदाणीतून बाहेर पडलेला
तुझ्या हाकेचा सोनेरी पक्षी
आला असता असाच,
हजार तुफानांच्या तांडवांवर
पर्वतांवर
मंदिरगोपुरांच्या शिखरवांर
समुद्राच्या तटस्थ विस्तारावर पीस फिरवीत
आपल्या पंखांच्या मुलायम सावलीचे,
माझ्याकडे.

## दुर्गारूप

ही दुर्गामाता
जेव्हा घेते रूप रणरागिणीचे
असतो तेव्हाही तिच्या एका हातात
अमृताने भरलेला कलश
जो आज आहे—
        माझ्या भूमीच्याही.
आणि असतात तिच्या सतरा हातांमध्ये
उन्मत्त असुरांना चिरडणारी
बलवान् अजिंक्य शस्त्रे
त्या अमृताच्या रक्षणासाठी;
जी आज आहेत
आणि सदैव असायला हवीत
        माझ्या भूमीच्याही.

## चुगली

सोंग घेतले किती कसेही
तरी लबाडी पचते का ?
रात्र होउनी घनांध येणे
हे तुजला तरि रुचते का ?

काळोखाच्या सुस्त घनांचे
अवतरता खोलीत थवे
मूक काजळी हिमसेकासम
मी म्हटले—हे काय नवे ?

रोज येतसे रात्र परी ती
वृक्षांच्या निबिडात शिरे
विराट काळ्या बिजूप्रमाणे
कौलारावर संथ फिरे.

आज विजेपरि आत घुसे ती
चिरे तोडुनी सदनाचे
दिवे मालवुनि सराइतीने
स्पर्श पेटवी दहनाचे.

त्या स्पर्शाने चुगली केली
        सोंग तुझे अवघे निखळे
रात्र होउनी कोण भेटले
        पुरे कळे हे – पुरे कळे.

## मूर म्हणाला :

तुफान भीषण ओसरल्यावर
—बंदरातल्या मीलनवेळी
मूर म्हणाला—
संपायाचे असेल जीवन
तर संपावे
तृप्तीने शिग भरभरलेल्या
अशा क्षणाला.

तुफान नव्हते नव्हते मीलन
नव्हते बंदर
टक टक टाके घड्याळ घाली
उत्तर रात्री नीरवतेवर
धुंद धुक्याची कोचाभवती पडे छावणी
तरळत होते ओठावरती
द्राक्षाचे द्रव
जमिनीवरती कलंडलेले
मेजदिव्याचे प्रकाशलाघव

सोनपंख पसरून उतरल्या
अशा क्षणाला अवकाशातुन
आठवणी तव.

## जरा जवळता

दुरून केवळ रम्यपणाचे
झाले दर्शन,
वाटत होते मलयगिरीवर
उसासलेली चंदनकमले
एक खगापरि पंख लेवुनी
आले त्यातुन.
जरा जवळता दलादलावर
साकळलेले स्फटिकाचे दव
आज देखले
सुंदरतेच्या अशा पिसाला
कारुण्याची किनार असते
हे मज कळले
अलगपणाचे शिवार तोडुन
व्यथाव्यथांचे हात हिंपुटे
सहजच जुळले.

...राठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible] ...९१३४० ... दि: ...[illegible]
[illegible] ... नोंद दि ...[illegible]

# सूत्रधार

भरतवाक्याचे सूर
सारंगीच्या तारेजवळ
आसमंतातून जमा होत आहेत
आणि अचानक
मला आढळले आहे
की नांदीचे पद
मी कधी म्हटलेच नाही.
म्हणून या भैरवीच्या वेळी
स्तब्ध उभा राहून
मी आवाहन करतो आहे
यमनकल्याणाच्या
सदाशिव स्वरांना.

## यमके

विद्वद्वर हा भव्य समीक्षा कसून जेव्हा करतो.
एक पिढीचा रसिकवर्ग ती समजुन घेता मरतो.

विवाह किल्ला, दुर्गम तट ते, पत्नी किल्लेदार
तिला न कळते किती भुयारे व्हाया मधुन पसार.

काव्य असावे शुद्ध जळासम त्यात नसावे रंग
म्हणजे रमणी शुद्ध असावी तिला नसावे अंग.

भ्रष्टाचार निवारण करण्या साधू एक निघाला
तिकिटावाचुनि प्रवास करतो म्हणुन तुरुंगी पडला.

कामराजयोजना सतीने घरात करता जारी
स्थानभ्रष्ट पति करू लागला संघटना शेजारी.

चंद्र फोडतो नभि किंकाळी, आला मानव आला
तारा म्हणती, कशास आधी असा घरोबा केला ?

महाग कपडा, अद्‌भुत शिलई, परीट वाजवि बारा
म्हणून निघती नग्न पंथ ते, उपाय नाही दुसरा.

रामासम देवासहि दुर्लभ हा चंद्राचा ताठा
कोसळता अंगावर कुत्री—होय बावळा बेटा.

पुरुष जंगली पशूच मेले, एक म्हणाली, त्यांस
लग्न लावुनी हवा द्यावया जन्माचा वनवास.

कापडांत घ्या खादी कापड तयात जादू वसे
राहतात ना कधी रिकामे या कपड्यांचे खिसे.

ध्रुवताऱ्यासम प्रेम चिरंतन कविजन सारे म्हणती
पण एका रस्त्यात दहादा ध्रुवतारे त्या दिसती.

गीतपद्धती नवी म्हणाले गाउ लागले खान
स्वरावाचुनी हलवुनि केवळ अंग मारती तान.

अरब म्हणाला, खुदा असावा एक मला हे पटले
परि बाइलही एक असावी, अजब तत्त्व हे कुठले?

# यमके

## शेर . इ. इश्क

(मराठी मासिकातील उर्दू शायरीची भाषांतरे वाचून स्फुरलेली)

जिगर हाय मम तुडवित जासी कुठल्या बलमाकडे
अरे शराबी, नळावरी मी भरते आहे घडे.

बेहस्तातिल परी सखे, तू मी इश्काचा शहा
खिशात खजिना किती शहाजी अगुद़र मोजुन पहा.

हजार हृदये चिरसी तू तर शिकंद़राहुन गाजी
हाटेलामधि होते सैय्या चिरावया मी भाजी.

खुदा तुझ्यावर फिदा, नयनि घन, उषाच अधरी हसे
बुद्दू बालम ! दो रुपड्यांची रंगखरेदी असे.

नजर तुझी ही नादिरशाही खून पाडते किती
म्हणून पोलिस खिडकीखाली शीळ सदा फुंकती ?

तू नाहिस तर फकीर होउनि तुडविन भूमंडल
एक तमन्ना–इन्कारासह देइ विडीबंडल.

सदा पाहते लयला माझी—भाग्यवान आरसा
काय बिचारी करील दुसरे, धंदा पडला तसा.

अश्रूंच्या तुज पुरात बुडविन हे दगडी देवते,
हाय बालमा, टिळक तलावी बक्षिस मी मिळविते.

बुलंद झुल्पामध्ये तुझ्या मी अडकुनि पडलो पहा
विंचरता मी रोज काढते असे फणीने दहा !

मी थडग्यातुनि टोचुनि म्हटले, शोक अता का असा ?
ती उत्तरली, कुठे टाकला तू पैशाचा कसा ?

एक तरी तू वाक्य बोल हे अस्मानातिल परी
'बाबा माझा खाटिक त्याच्या सदैव हाती सुरी.'

## वाट

या रस्त्याला शेवट नाही
परंतु हा रस्ता तर आहे
पुन्हा असा की चंद्रकळ्यांचा
इंद्र रुजामा ज्यावर आहे.

नाही मंझिल—खंत कशाला
स्पर्श असा हा अमृत हाती
तळातळावर सराईतल्या
रसगंधाच्या सुरया भरती.

या वाटेतच वाटसरूपण
झाले सुंदर सफल सकारण.

## कबुली

मी आहे
शब्दलंपट —
शब्दांच्या वारांगना
सज्जावर उभ्या राहून
खुणावतात मला,
कोठल्या तरी दाहक रसायनात
वितळतात सारे प्रतिकार
आणि मी जातो
ते बहिष्कृत दरवाजे लोटून
सरळ आत
अर्थांचा हिशेब न करता.

# आग

सुंदरतेचा शोध घ्यावया आलो होतो
भेट होतसे परंतु तेथे ही करुणाची
संसारातिल शिवसुंदर जे त्याच्या भवती
आग ठेवली पेरुनि आम्ही ही सरणाची.

# नकार

भक्तांच्या जयघोषांत
मंदिराकडे चाललेल्या
रथाच्या
चाकाला
कोणाचें रक्त
लागलें आहे ?
माफ करा
जयघोष करणाऱ्यांनो,
माझें मन
तुमच्याप्रमाणे
त्या चक्राबरोबर
मंदिराकडे जात नाही;
तें चाललें आहे
रक्ताच्या त्या रेषेबरोबर
पाठीमागे.

## चांद माझा—

चंद्र तुमचा वेगळा जो अंतराळी राहतो
चंद्र माझा अंतरीचा मीच केवळ पाहतो.
दीन तो शास्त्रापुढें सामंत होउनि वाकला
श्वान याने माकडे-इत्यादिकांनी झाकला.
मार्गदीपक पालिकेच्या तो दयेवर लोंबतो
कीटपंखांचा जथा ज्योतीस त्याच्या झोंबतो.
जाणत्यांचा हा जमाना, रूप त्याचे देखती
हास्य त्याचे लास्य त्याचे टेबलावर जोखती.
चांद माझा वेगळा खाविंद हा तख्तावरी
ज्ञानविज्ञाने तयाची स्पर्शती ना पायरी.
भाव माझे गीत माझे रंग जे मी रेखतो
राजवाडे त्यांत बांधुन राहतो सुखरूप तो.
तो तळ्यावर डुंबतो दर्याकिनारी हिंडतो
चुंबनाने झाकल्या नेत्रातुनी ओसंडतो.
हात देतो तो व्यथेला साथ देतो सुंदरा
तो मनोगत ईश्वराचे सांगतो या नश्वरा.
येउद्या आकाशयाने वर्षुद्या श्वानावळी
दिग्फुलाची या न केव्हा भ्रष्ट होइल पाकळी.

## कालकन्या

रेलगाड्या राक्षसी त्या मी तमातुन पाहतो
फोडुनी भिंती हवेच्या वेग ज्यांचा वाहतो.

कालकन्या केस पिंजुन वादळासव सेवुनी
सिंहिणीसम धावती क्षितिजावरी संतापुनी.

घातली दोल्यात पृथ्वी मागुती भिंगारते
झेपते जे आढ्यातेने होय दृष्टीपार ते.

जंगलांच्या नीरवावर त्या कट्यारी मारती
तीव्र कर्कश घोषितांच्या, वृक्षडोंगर कापती

शूल खोचुन पेटलेले रात्रिच्या निबिडावरी
शामियाना दीप्तिचा देती उभारुन अंबरी.

एकल्या वंध्या घरांना दान देती सावल्या
शीर्णतेवर शीतलाच्या जात माळा ओवल्या.

सर्पिणीसम बोगद्यातुन त्या बघा सरसावती
झुंज तेथे ये धुमाळुन संथ थोडी हो गती.

दणदणे लोखंड खाली क्रंदती भवती शिळा
अजगरी तिमिरात घुसतो हिंस्र तेजाचा सुळा.

:

जिंकुनी येता गुहेतुन ऊन सोन्याचे वडे
शीळ घालुन फेकती गर्वस्मिते गगनाकडे.

सर्व साखळदंड तोडुन मुक्त या युगभावना
लाल हिरव्या तोरणांतुन हो गतीची साधना.

गर्जती त्या धावती दिनरात अंतर तोडती
फोडुनी तट दूरतेचे एक सारे जोडती.

## ही सराई

ही सराई सोडता नेशील काही चांदणे
माझिया नीलातले
जी स्वरांची चंद्रशाला बांधली मी भोवती
सूर काही त्यातले
पंख जे आकाशितांचा वेध घेती केधवा
बावरे होतील ते
ओघ हा थांबेल थोडा सावळ्या डोहामध्ये
सावल्यांची चेष्टिते.
हे असे होईल आहे माहिती पांथा मला
जीविताच्या अंबरी
वीज वादळ नेहमीची इंद्रचापांच्या लता
बहरती केव्हां तरी
खंत नाही, जे श्रुतीचे गीत मैफल संपता
ते स्मृतीचे होतसे
या शिळांना जागृतीतहि वेढुनी बसतील ती
चांदण्यातिल साहसे.

## पंढरीच्या राया—

पंढरीच्या राया । अगा लोकपाळा
काय तुझी कळा । तुझ्या धामी ॥
अनादी अनंत । त्रैलोक्याचा राणा
झालास किराणा । माल येथे ॥
गाभाऱ्यात तुझ्या । टाकताच पाय
दोन भीमकाय । रक्षकांचे—॥
तुझ्याआधी घडे । मजला दर्शन
भक्तीला बंधन । त्रयस्थांचे ॥
धनकोशावर । केसाळ भुजंग
तसा त्यांचा संग । तुझ्या ठायी ॥
दोन शिपायांच्या । मध्ये कैदी जसा
होतास तू तसा । बंदिवान ॥
भारावला जीव । क्रमताना वाट
भावनेचा घट । कलंडला ॥
टाका टाका द्रव्य । एक गदारोळ
हातातील माळ । थरथरे ॥
आधी खिशातील । ठेवा येथे नोट
मग लावा बोट । चरणास ॥

व्हावा तुझ्यापुढे । तुझाच आठव
व्याप ताप भव । विसरावे ॥
साऱ्या प्राणतेचे । व्हावे दोन हात
स्पर्श पावलांत । द्रवताना ॥
भाव भगीरथी । शतकांची शत
तिच्या प्रवाहात । थेंब व्हावे ॥
विश्वाचा आसरा । ज्ञानाचा किनारा
भक्तीचा फुल्वरा । शोध घ्यावा ॥
नामा तुकयाने । वसविले पूर
व्हावे क्षणभर । नागरिक ॥
अगा जगजेठी । आलो तुझ्यासाठी
गवसलो हाटी । पेंढाऱ्यांच्या ॥
अळेबळे तरी । मिटले मी डोळे
हात जुळविले । छातीवरी ॥
तोच जाणिवेच्या । मस्तकी प्रहार
अहो, पायावर । द्रव्य ठेवा ॥
देह मन आत्मा । इत्यादींची जाण
जळांत लवण । झळंबले ॥
अगा देवराया । तुझिया द्वारात
पाकीट रूपात । उरलो मी ॥
परतले मन । शरीराच्या संगे
नास्तिकांचे दंगे । आवरीत ॥

## वादळ-वेल

वादळाची लाट अशी
मुक्त केशकलापाची,
अरण्ये नी
मध्यरात्र
यांच्या स्वैर मिलाफाची,
पर्वतांच्या सागरांच्या
स्वप्नांतील आलापांची,
आदळता
वेलावर
पान फूल खाली पडे,
आकाशाच्या सारांशाची
अनावृत भेट घडे.

## आदिवासी

रानटी मी आदिवासी
या पथीं संचारतों ।
रूपशाली वाहनांचा ओघ ज्यावर
वाहतो ॥
जंगली मातीतृणांच्या
शिंपतां मार्गीं खुणा ।
संस्कृतीच्या पापण्यांतुन क्रुद्धता
काढी फणा ॥
मी दुकानीं जातसें
थैलींत घेउनि तारका ।
त्या पुढारुन सांगतों मज
स्वप्न सुंदर द्याल का ? ॥
हासती रागावती धिक्कारुनी ते
बोलती ।
चांदण्यांच्या बर्बरा, येथे न मुद्रा
चालती ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व
अनुक्रम ७९३५० दि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

सर्व

मीत्व आहे
एक केवळ ।
सर्व आणिक सर्वथा ॥
तेच देते सर्वतेला ।
पंख आणिक
ही व्यथा ॥

REFBK-0017548
REFBK-0017548

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१७५४८